# राष्ट्रीय आरोग्य अभियान,
# जिल्हा परिषद, सातारा
# कंत्राटी योगशिक्षक भरतीच्या सुचना

- योग प्रशिक्षक म्हणून निवड करताना प्रकल्प कृती आराखडा सन २०२१-२२ च्या अन्वये ३१ मार्च २०२२ पर्यंत कंत्राटी नियुक्ती केली जाणार आहे.
- योग प्रशिक्षकाला प्रत्येक आठवड्यात कार्यरत उपकेंद्र, प्रा.आ.केंद्र व आयुष आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये एक शिबीर आयोजित करायचे आहे.
- प्रत्येक शिबिरामागे प्रत्येक योग शिक्षकाला रु.५००/- मानधन प्रा.आ.केंद्र स्तरावरुन शिबिरांच्या संख्येनुसार दिले जाणार आहे.
- एका योग शिक्षकाला एका संस्थेत महिन्यात अधिकतम ०८ शिबिरे घेण्यास परवानगी आहे, ०८ शिबिरांपेक्षा जास्त शिबिरे घेता येणार नाही.
- योग प्रशिक्षकांकडे योग प्रशिक्षणासंबंधी मुळ कागदपत्रे (Diploma, Degree) असेल अशा प्रशिक्षकांनी या लिंक/क्युआर कोड वर दि. ०६-१२-२०२१ पर्यंत कार्यालयीन वेळेत आपला ऑनलाईन अर्ज सादर करावेत. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
- उमेदवारांनी कोविड-१९ च्या परिस्थितीच्या अनुषंगाने वारंवार कार्यालयामध्ये चौकशीसाठी येऊ नये, उमेदवारांसाठीच्या सुचना वेळोवेळी www.zpsatara.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द केली जाईल.
- उमेदवारांना एकदा दिलेल्या कंत्राटी नियुक्ती आदेशामध्ये कोणत्याही प्रकारे बदली दिली जाणार नाही व त्याबाबत कोणत्याही पदाधिकाऱ्यांमार्फत शिफारस करु नये.
- भरती प्रक्रियेमध्ये पुढीलप्रमाणे गुणानुक्रमे (Merit) ठरविले जाईल.
    १. योगा डिग्री असलेस १० मार्क
    २. योगा डिप्लोमा असलेस १० मार्क
    ३. शासकीय व निमशासकीय संस्था अनुभव असलेस १० मार्क
    ४. इतर गुण प्रात्यक्षिक व मुलाखतीद्वारे दिले जातील.
- भरती संबंधी वेळोवेळी जाहीरातीत बदल करण्याचे सर्वस्वी अधिकार मा. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.
- उमेदवाराला ऑनलाईन अर्ज करणेसाठी प्रक्रिया शुल्क रु. ३००/- ना परतावा स्वरुपात आकारण्यात येणार आहे.